महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लिमिटेड
Maharashtra State Co-op. Sugar Factories Federation Ltd.
(Registered under Sec. 10 of Bombay Co-op. Societies Act. 1925)
"SAKHAR BHAVAN", 11th Floor, 230, Nariman Point, Mumbai - 400 021.

सं.क्र.लेखा(49)/सभासद वर्गणी/2015–16/51 दिनांक: 21/04/2015

प्रति,
मा.श्री.——————————

अध्यक्ष,
——————————स.सा.का.लि.,

जिल्हा——————————

विषय:– साखर संघाची निवडणूक व त्यानुषंगाने सभासद वर्गणी पाठविणेबाबत.

संदर्भ:– 1.संघ पत्र क्र.लेखा(49)/सभा.वर्गणी/2014–15/292 दि.28/7/2014.
2.संघ पत्र क्र.लेखा/सा.आयुक्त/सभा.वर्गणी/2014–15/305 दि.4/9/2014.
3.संघ पत्र क्र.लेखा(49)/सभा.वर्गणी/2014–15/602 दि.10/11/2014.
4.संघ पत्र क्र.लेखा/सा.आयुक्त/सभा.वर्गणी/2014–15/744 दि.29/12/14.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रांन्वये वेळोवेळी सभासद वर्गणीची मागणी करुन देखील आपल्या कारखान्याकडून अद्याप वर्गणी येणे बाकी आहे.

साखर संघाच्या संचालक मंडळाच्या दि.13 एप्रिल,2015 रोजी झालेल्या सभेत साखर कारखान्याकडून येणे असलेली संघ वर्गणी पाठविणेबाबत विषय ठेवण्यात आला होता. सदर विषयावर संचालक मंडळाच्या मा.सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. दि.9/4/2015 अखेर एकूण थकीत रु.13.07 कोटी कारखान्यांकडून येणे आहेत. यास्तव थकीत वर्गणी पाहता सर्व सभासद कारखान्यांनी आपली देय वर्गणी त्वरीत साखर संघास अदा करावी असे ठरविण्यात आले.

97 व्या घटना दुरुस्ती नियमानुसार साखर संघाच्या पोटनियमास मान्यता मिळाली असून लवकरच निवडणूक प्रक्रिया सुरु होत आहे. 97व्या घटना दुरुस्तीनुसार व सुधारित पोटनियमाप्रमाणे साखर संघाच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये थकबाकीदार सभासदांना भाग घेता येणार नाही अथवा मतदान करता येणार नाही. त्यामुळे आपल्या कारखान्याकडून आजअखेर थकीत येणे असलेली रक्कम रु.—————— दि.5/5/2015 पूर्वी साखर संघास पाठवून आपल्या कारखान्याचे निरंक प्रमाणपत्र घ्यावे, ही विनंती. नेहमीच्या सहकार्याबद्दल आभारी आहोत.

कळावे,

आपला विश्वासू,

संजीव बाबर
व्यवस्थापकीय संचालक

नापा/सौपा.

Telephones : 2204 2676 / 2901 / 4068 6900 • Fax : 022 - 2204 2578 / 4068 6998 • Telegram : "SAKARSANGH" Mumbai
E-mail : mahasugarfed@gmail.com • Website : www.mahasugarfed.org